पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड - ४११ ०३३.

**ई-टेंडरींग निविदा क्र. ब प्रभाग आरोग्य ५ / २०१०-२०११**

पिंपरी चिंचवड महानगरनगरपालिका खालील नमुद केलेल्या कामासाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा दर मागविणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा र.रू | बयाणा र.रू | अनामत र.रू | कामाची मुदत | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब प्रभाग परिसरात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी झेन फॉग व वॅन फॉग मशिन ठेवून कामकाज करण्यासाठी आवश्यक पेट्रोल रिक्षा टेम्पो भाड्याने वाहनचालकासह घेणे. | २०००००/- | २०००/- | १००००/- | ११ महिने | ३००/- |

वरील कामासाठी तपशील अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी व शर्ती निविदा शेडयुल इत्यादीची माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in वेब साईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या ई-टेंडरींग पध्दतीने मनपाच्या वेबसाईटवरून भरावयाची आहे. याकामी मनपाच्या मुख्य आरोग्य विभागात पुरवठाधारकाने किंवा निविदा धारकाने नोंदणी करणे. नोंदणी करण्यासाठी नोंदणी फी र.रू.३०००/- चा डिमांड ड्राफ्ट व योग्य ती कागदपत्रे आरोग्य मुख्य कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. ई-टेंडरींग अंतर्गत नोंदणी बाबतची सविस्तर माहिती आरोग्य मुख्य कार्यालयात मिळेल सदरची निविदा भरणेसाठी ई-टेंडरींग नोंदणी अर्ज दि. ०९/०८/१० दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत नोंदणी करताना आयकर भरीत असल्याबाबत पुरावा निविदाधारक व्यक्ती स्वतःच्या मालकीचा एक टॅम्पो, सन १९९५ नंतरचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. त्याचे पुराव्यासाठी R.T.O चे नोंदणी प्रमाणपत्र व फिटनेस

सर्टिफिकिट, विमा इत्यादीच्या मुळ प्रती सादर कराव्या लागतील. सदरची ई टेंडरींग प्रक्रियांतर्गत निविदा दि. **०९/०८/२०१०** ते दि. **३०/०८/२०१०** दु. ३.०० वाजेपर्यंत ई टेंडरींग वेब साईटवर भरता येईल. शक्य झाल्यास निविदा त्याच दिवशी उघडणेत येईल. जे निविदाधारक ई टेंडरींग प्रक्रियेअंतर्गत नोंदणी करतील त्यानांच Digital key देण्यात येणार आहे. त्यांना निविदा भरता येईल निविदा धारकांनी निविदेची पावती, बयाणा रक्कम, फॉर्म फी मनपा खात्यात ऑनलाईन सिस्टीम (EBS) व्दारे भरावयाची आहे. सदर निविदा फॉर्म विक्री साठी ठेवण्यात येणार नाही व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवला जाणार नाही. कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अशंतः मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार प्रभाग अधिकारी यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. सदरची निविदा www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
प्रभाग अधिकारी (ब प्रभाग)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड ४११ ०३३

जाहीरात क्र. :- **११७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३

क्रमांक :- एएमसी/बप्र/७ /कावि/ ४६५ /२०१०.

दिनांक :- ०४ /०८/२०१०.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८.
आरोग्य विभाग
दरपत्रक

१). पुरवठाधारकाचे नाव व पत्ता :-
२). फर्मचे/व्यवसायाचे नाव व पत्ता :-
३). व्यवसायाचे स्वरूप :-
४). रजिस्टर नंबर :-
५). सेल टॅक्स नंबर :-
६). पॅन कार्ड नं. :-
७). वाहनाचा मेक/कंपनी :-
८). खरेदी दिनांक :-
९). अन्य माहिती असल्यास :-
१०). दर :-

मी./आम्ही. श्री/श्रीम. राहणार नमुद करतो की, माझेकडे/आमचेकडे स्वत:चे मालकीचा चांगल्या स्थितीतील

वाहन आहे त्या संबधींची आवश्यक कागदपत्रे मी/आम्ही समाविष्ठ केली आहे.

मला/आम्हाला निविदा कामासंबधीच्या उपरोक्त १ ते २१ अटी मान्य आहेत व मी/आम्ही ब प्रभाग परिसरात धुरीकरण करणेसाठी लागणा-या झेन फॉग व व्हॅन फॉग मशिनसाठी आवश्यक तीन चाकी रिक्षा टेंम्पो मी पुरविण्यास तयार आहे. याकामासाठीचा प्रति दिन प्रति टॅम्पो र.रू. /- (अक्षरी ) यादराने सकाळी ७.०० ते ११.०० आणि संध्याकाळी ४.३० ते ०७.३० (दोन ट्रीपा) यावेळेत मी काम करण्यास तयार आहे. या कामासाठी म.न.पा. ने दिलेल्या नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

निविदा धारकाची सही
नाव
पत्ता

**सही/-**
प्रभाग अधिकारी
ब प्रभाग कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
चिंचवड - ४११ ०३३.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**ब प्रभाग कार्यालय, चिंचवड - ४११ ०३३.**
**ई-टेंडरींग निविदा क्र. ५ / २०१०-११.**

## अटी व नियम

१). अटीयुक्त निविदा स्विकारल्या जाणार नाही.

२). सदर कामाची मुदत ११ महिने असेल, परंतु मनपा चे वाहन उपलब्ध झाल्यास सदरचा ठेका बंद करण्यात येईल.

३). रिक्षा टेंम्पोमधुन धुरीकरण करीत असताना वाहन चालकास वाहनापासुन समोरील व्यक्तीस किंवा वाहन चालकास काही इजा झालेस अथवा दगावल्यास तसेच वाहनाचे काही नुकसान झालेस मनपा कडुन कोणतीही भरपाई मिळणार नाही.

४). ब प्रभाग परिसरातील छोट्या - मोठ्या गल्ली मध्ये तसेच झोपडपट्टीमध्ये रिक्षा टेम्पो घेऊन धुरीकरणाचे काम करावे लागेल.

५). सदर ठेकेदारास सदरचे काम पोट ठेक्याने देता येणार नाही.

६). रिक्षा टेंम्पो हा किटकनाशक विभागाच्या पिंपरी ओव्हर ब्रिज खालील ऑफीसमध्ये दररोज सकाळी ७ ते ११ आणि संध्याकाळी ४.०० ते १०.०० उभा करावा व तेथुन मुख्य आरोग्य निरिक्षक व आरोग्य निरिक्षक (किटकनाशक) यांनी दिलेल्या मशिन व कर्मचारी रिक्षा टेम्पोमध्ये घेऊन दिलेल्या सुचनेनुसार ब प्रभाग परिसरामध्ये धुरीकरणाचे काम करावे व काम झाल्यावर परत रात्री १०.०० वा. मशिन पिंपरी ओव्हर ब्रिज खालील ऑफीसमध्ये जमा करावे.

७). रिक्षा टेम्पोचे पुढील व मागील लाईट चालु असने आवश्यक आहे.

८). प्रत्येक दिवशी (सुट्टीचे दिवशीही) रिक्षा टेम्पो पुरवावा लागेल. स्वतःचा टेंम्पो बिघडल्यास पर्यांयी टेम्पोची व्यवस्था करावी लागेल तसेच कामाच्या आवश्यकतेनुसार जादा रिक्षा टेम्पो वाढवावे लागतील.

९). रिक्षा टेम्पो अभावी धुरीकरण न झाल्यास त्या दिवसाचे रिक्षा भाडे दिले जाणार नाही व दंड म्हणुन र.रू. २००/- प्रति दिनी प्रति रिक्षा टेम्पोस आकारणेत येईल व ते बिलामधुन कमी करणेत येईल. बिलामधुन धुरीकरणासाठी रिक्षा टेम्पो ब प्रभाग परीसरात पेट्रोल अभावी अथवा तांत्रिक कारणामुळे बंद पडल्यास व त्यामुळे धुरीकरणाचे काम पुर्ण न झाल्यास त्या दिवसाचे रिक्षा टेम्पोचे भाडे दिले जाणार नाही.

१०). पावसामध्ये वाहनामधील मशीन भिजु नये म्हणून ताडपत्री किंवा इतर झाकन टाकावे लागेल.

११). रिक्षा टेम्पोमधील मशिनचे रिक्षा टेम्पो चालकाच्या निष्काळजीपणामुळे बिघाड झाल्यास ठेकेदाराने स्वखर्चाने करून द्यावा लागेल.

१२). धुरीकरणासाठी पुरविणेत आलेल्या रिक्षा टेम्पोचे काम प्रत्येक दिवशी समाधानकारक झाल्याचे तसेच धुरीकरण केलेल्या परीसरात झाले त्याबाबतचे स्वतंत्र रजिस्टर ठेवुन त्यावर आरोग्य निरिक्षक,मुख्य आरोग्य निरिक्षक व सहा. आरोग्याधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन बिल सादर करताना बिलासोबत अभिप्रायासह रजिस्टर सादर करणे आवश्यक आहे.

१३). धुरीकरणाची मशिन अभावी धुरीकरणाचे काम बंद असेल त्या दिवसाचे बिल अदा केले जाणार नाही.

१४). सदर कामी तीनचाकी पेट्रोल रिक्षा टेम्पो वाहनचालकासह पुरविण्यात यावा.

१५). ठेकेदाराने वाहन चालक हा लायसन धारक असणारा द्यावा लागेल.

१६). वाहनावर कामकरीत असलेल्या वाहन चालकाचा विमा, ESI, प्रा.फंड तसेच किमान वेतन कायद्याची पूर्तता करण्याची जबाबदारी संबधित ठेकेदारांची राहील. (लेबर ॲक्टचे पालन करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील).

१७). निविदा स्विकृती केल्यानंतर कामाचा करारनामा स्वखर्चाने करून करारनामा करतेवेळी अशी संस्था मनपाने विद्यमान नगरसेवक /स्विकृत सदस्य अथवा अधिकारी/कर्मचारी यांच्याशी काहीही हितसंबध नाही. याची खातरजमा होणेकरिता र.रू. १००/- चे स्टँमपेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करून द्यावे लागेल.

१८). टॅम्पो वर नेमलेल्या कर्मचा-यांना काही अपघात होऊन काही तक्रार उद्‌भवल्यास अथवा नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच ठेक्यातील नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना मनपा सेवेत सामावुन घेणेबाबत हक्क राहणार नाही. यांची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच कामासंबधीच्या काही कायदेशीर बाब निर्माण झाल्यास सदरची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

१९). वरील सर्व अटी व शर्तीचे पालन न केल्यास आपला सदरचा ठेका रद्द करणेत येऊन अनामत रक्कम जप्त करणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच अटी युक्त निविदा स्विकारली जाणार नाही.

२०). कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क प्रभाग अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

२१). सदर प्रकरणी काही वाद उद्‌भवल्यास मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे एक सदस्यीय लवाद असेल.

सही/-
प्रभाग अधिकारी (ब प्रभाग)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड ४११ ०३३